नि.फौ.ख.क्रं. १९४/२०२३

सरकार –वि– राहुल चौधरी व इतर

नि.क्र. २५४

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०८ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – चंद्रशेखर महादेव खारोडे,

वय ३३ वर्षे, व्यवसाय – कनिष्ठ लिपीक, जलसंपदा विभाग, शेगाव,

राहणार – खामगाव, ता. खामगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सरकारी वकील.**

१. तुरंगात असलेला आरोपी राहुल चौधरी याला मी ओळखतो कारण पोलीसांनी मला पंचनामा करण्याच्यावेळेस बोलविले होते. पोलीसांनी माझ्या कार्यालयाला पत्र दिले होते. पंचनामा करण्यासाठी मी पोलीस अधिकाऱ्यांसोबत गौलखेड रोडवर गेलो होतो. त्यावेळेस आमच्या सोबत आरोपी राहुल चौधरी होता. गौलखेड रोडवर आरोपी राहुल चौधरी राहत असलेल्या घरी व कार्यालयात आम्ही पंचनामा करण्यासाठी गेलो होतो. मला व पोलीसांना आरोपी राहुल चौधरी याचे घर त्यानेच दाखविले होते. आरोपी राहुल चौधरी याचे घर कोणत्या एरियामध्ये होते हे मला माहित नाही. आरोपी स्वतः आम्हाला त्याच्या घरी घेवून गेला होता. आरोपी राहुल चौधरी याचे घर पक्क्या बांधकामाचे होते. आरोपीच्या घराच्या समोर गौलखेड रोड आहे. ज्या घरी आम्ही गेलो होते ते घर भाड्याने तायडे नामक व्यक्तीला दिले होते व त्या घरी मिसेस तायडे राहत होत्या. सदरचे घर अंबादास खेडकर यांच्या मालकीचे होते. माझ्या समक्ष पोलीसांनी त्या घराचा पंचनामा केला. आता मला घराचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दुसरे पंच राजेंद्र बाबुराव धोरण यांची सही आहे. पंचनाम्यावर घर मालकांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र. २५५** देण्यात येते. त्यानंतर आम्ही त्याच घराच्या बाजुला असलेल्या गोडाऊनमध्ये गेलो होतो. ते गोडाऊन टीनशेडचे होते. टिनशेडच्या गोडाऊनमध्ये सुतळीच्या पोतड्या होत्या. त्या गोडाऊनमध्ये हिरो कंपनीची दुचाकी गाडी, पलंग, ड्रेसिंग टेबल व लाकडी टेबल होते. माझ्या समक्ष पोलीसांनी पंचनामा केला. पंचनाम्याच्या वेळेस पोलीसांनी दुचाकी गाडी, ड्रेसिंग टेबल व पलंग बघितले. पोलीसांना एका टेबलमध्ये पावती मिळाली. ती पावती पोलीसांनी जप्त केली. तीन चार छायांकीत पावत्या पोलीसांनी जप्त केल्या. माझ्या सह्या पोलीसांनी पंचनाम्यावर घेतल्या. पंचनाम्याच्या वेळेस गोडाऊनमध्ये गोडाऊनचे मालक वासुदेव मुऱ्हे हजर होते. आता मला घर झडती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझ्या व दुसरे पंच राजेंद्र धोरण व घरमालक यांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र. २५६** देण्यात येते. तायडे यांनी पोलीसांना माझ्या समक्ष भाडेतत्तवाचा करारनामा दिला होता. अजून काय दिले होते हे आता मला आठवत नाही. आता मला तायडे यांनी पोलीसांना माझ्यासमक्ष दिलेला करारनामा दाखविला. तो तोच आहे.

**सरतपास संपला.**

<u>उलटतपास आरोपी क्र. १ व ५ तर्फे श्री. एस. व्ही. तेलगोटे, वकील यांचे मार्फत.</u>

२. मी सन २०२२ पासून जलसंपदा विभागात कार्यरत आहे. माझ्या कामकाजाची वेळ सकाळी ९.४५ ते ६.१५ वाजेपर्यंत असते. मी कर्तव्यावर जात असतांना माझे हजेरीपट ठेवल्या जाते. हे म्हणणे खरे आहे की, वरिष्ठांच्या लेखी आदेशाशिवाय कार्यालयातून कोठेही बाहेर जाता येत नाही. पोलीसांसोबत पंचनामा करण्यासाठी जा याकरीता मला माझ्या वरिष्ठांनी लेखी आदेश दिला नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पोलीस स्टेशन शेगाव ग्रामीण यांच्याकडून माझ्या नावाने आदेश आला होता. तो आदेश मी वाचला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला दिलेला आदेश अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वरिष्ठांना पोलीसांकडून लेखी आदेश प्राप्त झाला नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, वरिष्ठांना तोंडी आदेश प्राप्त झाला होता. मी पोलीस स्टेशनला दुपारी ३.३० ते ४.०० च्या दरम्यान गेलो होतो. ज्या घरी मी गेलो होतो त्या दोन्ही घरी मी एखादा तास थांबलो असेल. पंचनाम्याच्या वेळेस मी घरमालकासोबत काही बोललो नव्हतो. घर मालकाला मी बघितले तर मी ओळखु शकत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी त्यांना एकदाच बघितले आहे.

३. पोलीसांनी तीन चार छायांकीत पावत्या जप्त केल्याचे पंचनाम्यात नमुद केले नव्हते. माझ्या समक्ष पोलीसांना मुऱ्हे यांनी करारनामा दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. २५५ व २५६ पोलीसांनी पोलीस स्टेशनलाच लिहून ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला लिहून ठेवलेल्या पंचनाम्यावर सह्या केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रत्यक्ष आरोपीच्या घरी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास आरोपी क्र. ६ तर्फे श्री. जी. व्ही. पिसे, वकील यांचे मार्फत.</u>

४. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलाही घर झडती पंचनामा तयार करण्यात आला नव्हता. यावेळेस विधीज्ञांनी आरोपी क्र. १ व ५ चा उलटतपास स्विकृत करत असल्याचे सांगितले.

<u>**उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे श्री. ए. बी. इंगळे यांनी आरोपी क्र. १ व ५ चा उलटतपास स्विकृत केला.**</u>

<u>उलटतपास संपला.</u>

<u>फेरतपास नाही.</u>

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(एन. डी. मेश्राम )
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि.०४.०४.२०२५

माझे समक्ष

स्वा/-
(एन. डी. मेश्राम )
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि.०४.०४.२०२५